2016-2017



ISSN No. 2394-9996

Vol- I

# New Vision

Multi-disciplinary
Bi-Annual
Research Journal

**Special Issue for National conference on**

## "Impact of Bhakti Movement & Sufism on Society"

**30th & 31st August 2016**

Anjuman Ishat -e- Taleem Beed's
Milliya Arts, Science & Management Science College,
Beed- 431122 (Maharashtra)
Website : www.milliyasrcollege.org
E-mail.ID : newvisionjournal@gmail.com

Multi Disciplinary Research Journal
New Vision

ISSN No.2394-9996

# मध्ययुगातील भक्ति साहित्य विद्रोह आणि स्वरुप

प्रा. जाधवर बी.डी.
इतिहास विभाग प्रमुख
आर.बी.अट्टल महा. गेवराई
मो.नं. ९४२१३५०८७३

प्रस्तावना :-

भारतीय भूमीवर मध्ययुगीन कालखंडामध्ये अनेक संप्रदायांचा उदय झाला व त्यांनी मोठ्या प्रमाणावर जनजागृती चे काम केले. म्हणजेच मानवतावादी समाजरचना आस्तित्वात यावी म्हणून विविध संप्रदायानी प्रयत्न केले. देशाच्या वेगवेगळ्या भागामध्ये जे संप्रदाय कार्यरत होते. त्यामधील विविध संतानी समाजाच्या परिवर्तनाचा पाया भक्कम करण्याचा प्रयत्न केला. या शिवाय मध्ययुगाच्या कालखंडामध्ये भारतीय संतानी समाज परिवर्तनासाठी साहित्याच्या माध्यमातुन विद्रोजह घडवून आणला. म्हणजे मध्ययुगीन भक्ती साहित्यातील विद्रोहाचे नेमके स्वरुप काय होते. त्याचा भारतीय समाजमनावर काय परिणाम झाला ? मध्ययुगीन कालखंडातील विद्रोही साहित्याचे भारतीय समाजमनावर कसा आणि कशाचा संस्कार तसेच संतांच्या शिकवणीची आज माणवास काही गरज आहे का ? या सर्व प्रश्नावर प्रस्तुत शोधनिबंधामध्ये मंथन होणार आहे ते खालील प्रमाणे.

मध्ययुगातील भक्तिसाहित्य विद्रोह व स्वरुप या बाबीवर प्रकाश टाकत असताना असे स्पष्ट होते की, विद्रोह ही एक प्रकारची राजकीय संकल्पना आहे. या वाक्यावर आपले मत मांडताना प्रा. वसंत डहाळे असे लिहितात विद्रोह ही एक संकल्पना आहे. त्यामुळे अव्यवस्था आणि असंतोषाच्या माध्यमातून विद्रोह जन्मास येतो. कारण असंतोष हा राजकीय, सामाजीक, आर्थिक, कारणामधून जन्मला येतो. विद्रोह हि मानसिक स्थिती आहे. त्या प्रमाणे ति सामाजिक राजकीय देखील आहे. एकंदर सत्तेच्या विरोधामध्ये काम करणे या घटनेत विद्रोह या नावाने संबोधले जाते म्हणजे शोषक संस्कृतीच्या विरोधात मध्ययुगीन कालखंडातील संतानी मोठ्या प्रमाणावर कार्य केले. त्यांच्या कार्यामधून साहित्याची निर्मिती केली. तसेच जातीधर्म, पंथ, निरपेक्ष असे जीवन जगण्याच्या मागे संतानी साहित्याच्या माध्यमातुन समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न केला. याशिवाय सामुदायीक सदाचार, एकात्मता तसेच समता बंधुभाव या मुल्यांची प्रतिष्ठापणा तत्कालीन जातीय आणि विषमता मूलक व्यवस्थेच्या विरोधात संतानी केली असे स्पष्ट होते. हा एक संत परंपरेचा विद्रोहच होता आणि तो विद्रोह त्या कालखंडातील धर्मसत्ते विरुध्द होता. म्हणजे राजकीय सत्ता देखील जातीच्या धर्माच्या प्रभावा खालीच असल्यामुळे संतानी राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, घडामोडीना विरोध करीत जातिधर्म, पंथ, निरपेक्ष अशी

पुरोहितांनी घालून दिलेली व्यवस्था संत परंपरेचे वरील प्रयत्न म्हणजेच मध्ययुगीन कालखंडातील संतांचा विद्रोह समजला जातो.२

भारतीय इतिहासातील मध्ययुगीन कालखंडामध्ये संस्कृत भाषेला ज्ञानभाषा या नावाने ओळखले जाऊ लागले. कारण त्यामुळेच मराठी भाषेसारख्या बोलीभाषेवर संस्कृत भाषेचे आणि ती ज्ञानभाषा आहे असे म्हणणाऱ्याचे आक्रमण झाले. परंतु मराठी भाषेवरील हे आक्रमण ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरी निर्मितीच्या कामगिरीने परत लावले हे स्पष्ट होते. एकंदर मराठी भाषेच्या सामर्थ्याची जाणीव आणि ही भाषा काव्य, तत्वज्ञान, शास्त्र कथन करण्याची क्षमता असणारी आहे ही जाणीव तमाम मराठी भाषकांना करून देण्याचे काम संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी निर्मितीच्या माध्यमातून केले. या सर्व घडामोडीतूनच ज्ञानेश्वरांनी विद्रोहाचे स्वरूप स्पष्ट होते. ३

तत्कालीन संतांनी साहित्य निर्मिती ही लोक भाषेत करून एक प्रकारचा विद्रोहच घडून आणला होता. भारतीय भाषेवर आक्रमण करणाऱ्या संस्कृत सारख्या भाषेला नकार देत लोकभाषेच्या स्विकाराची विद्रोही परंपरा या देशामध्ये आहे. म्हणूनच संत ज्ञानेश्वरांचा एक विद्रोह याच परंपरेतील आहे. कारण बुध्दांनी पाली भाषेत तर महावीराने अर्धमागधी भाषेत आपले तत्वज्ञान सांगितले तर चक्रधरस्वामींनी आपले विचार मराठी भाषेत कथन केले. संत ज्ञानेश्वरांनी मराठी ग्रंथ निर्मितीतून तत्वज्ञान व काव्य हे मराठीभाषेतुन सांगता येऊ शकते हे सिध्द केले. या शिवाय महात्मा बसवेश्वरांनी आपले विचार व तत्वज्ञान कन्नड भाषेतुन तर आंध्रातील वीर शैवानी तेलगु भाषेत, तामिळनाडूतील वीर शैवानी तामीळ भाषेत कबीराने प्रादेशिक हिन्दी तुन विचार स्पष्ट तर गुरू नानकांनी पंजाबी भाषेतुन विचार स्पष्ट केले. म्हणजे वरील सर्व घटनांचा असा अर्थ होतो की मध्ययुगीन भारतातील संतानी लोकभाषेचा कैवार स्वीकारला, प्रचार करीत नवे तत्वज्ञान, नवे विचार मांडले, यामधुनच संतानी प्रारस्थापितांच्या विरोधात घडवून आणलेला विद्रोहच होता.४

मध्ययुगाच्या काळामध्ये भारतात मोठ्या प्रमाणावर पुरोहिताचे प्राबल्य होते. असे म्हटले जाते कारण तत्कालीन सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर शुद्र आणि बहुजनाचे शोषण सुरू होते. विविध अत्याचारानी परिसीमा गाठलेली होती. अशा काळात वेद आणि देव यांच्या अनिर्बंध सत्तेला नकार देणे म्हणजे विद्रोह होय. समता बंधुता सामुदायीक सदाचार या प्रकाश मुल्यांची ज्योत समाजमनात तेवत ठेवयाचे कार्य म्हणजे विद्रोह होय. मध्ययुगीन काळात भक्ति आंदोलनामध्ये सहभागी झालेल्या संत महंतानी भेदाभेद, विविध देव देवतांच्या पूजा वेदप्रामाण्य, स्त्रीयांना शुद्र म्हणून देण्यात येणारी वागणुक पुनर्विवाहास प्रतिबंध, अंधश्रध्दा, यज्ञबळी अशा कितीतरी बाबीना प्रत्यक्ष अप्रत्यक्ष विरोध करण्याचे काम केले होते, यामध्ये मोठे काम महात्मा बसवेश्वरांचे होते. त्यांच्या संदर्भात कृष्णा मेणसे लिहितात, बसवेश्वरांना नेमके काय सांगायचे होते, त्यांना सांगायचे होते की, परंपरेने जन्मावरुन ठरविण्यात आलेल्या जाती आणि वर्ण हे सारे असत्य आहे. त्यामुळे माणसामाण्सात स्पृश्य-अस्पृश्य असा कोणताही भेदाभेद करु नये. स्त्री पुरुषांना समान वागणुक मिळावी. विधवाना सन्मानाने वागवावे आणि त्यांना पुर्नविवाह करण्यास संधी द्यावी. सती जाण्याची वाईट पथा बंद करावी मात्र बालविवास त्यांनी प्रखर विरोध केला होता. या शिवाय प्रत्येकाने दुसऱ्या व्यक्तीव विसंबुन राहू नये. स्वकुंबासाठी आवश्यक गोष्ट उपलब्ध

करुन देण्याचा सातत्याने प्रयत्न करावेत. स्वत: साठी मिळालेले धन काही अंशी समाजासाठी खर्च करावे. तसेच इष्ट लिंगा शिवाय इतर देवदेवतांची पूजा करु नये. देवळे मंदिरे बांधू नयेत तसेच अंधश्रध्दा बाळगू नये असे बसवेश्वरांनी स्पष्ट केले होते. ५

शिखधर्माचे संस्थापक गुरुनानक यांनी पारंपारिक व्यवस्थेला नवीन पर्याय उभा करण्याचा प्रयत्न केला. शिखांचा प्रसिध्द ग्रंथ 'गुरुग्रंथसाहेब' या ग्रंथामध्ये शिखांच्या एकूण दहा गुरुनी लिहीलेली वचने आहेत. त्यामध्ये संत नामदेव, शेख फरिद, संत रविदास या संतांच्या अभगांचा समावेश आहे. एकंदर समाज व्यवस्थेला पर्याय देणे जूनी व्यवस्था नाकारणे या घटनेस विद्रोह समजले जाते. एकंर गौतम बुध्द व महाविरा पासुन प्रेरणा घेऊन चक्रधर, गुरुनानक, बसवेश्वर अशा भारतीय संतानी समताविळीत व्यवस्था निर्माण करण्याचा जो प्रयत्न केला त्यास भक्ती साहित्यातील विद्राह असे म्हणतात.६

मध्ययुगीन काळातील भारतीय संतांची कामगीरी फार गौरव करण्यासारखी आहे. कारण भाषेचे देवाण घेवाणीचे त्यांचे कार्य अतिशय महत्त्वाचे आहे. तेराव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंत देशात भाषिल देवाण घेवाणीच्या सांस्कृतिक प्रक्रियेतून संतांनी भाषिक स्वातंत्र्य, भाषिक समता, भाषिक बंधूता तयार करण्याचे प्रयत्न केले. संत ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी, लिळाचरित्र, यामध्ये गंथामध्ये कानडी शबदांचा समावेश आहे. 'गोरखवाणी' या ग्रंथात मराठी शब्द आहेत. गोरक्षनाथ व इतर जे नाथपंथीय आहेत त्यांच्या बैरागी हिंदी भाषेचा संस्कार चक्रधर, नामदेव, तूकारामापर्यत अशा अनेक संतांच्या भाषेवर आहे. तोच प्रभाव कबीर व गुरुनानक यांच्याही भाषेवर आहे. संत श्रेष्ठ नरसी मेहता यांच्या गुजराती भाषेतील रचनामध्ये मराठी शब्द आहेत. परंतू नरसी मेहतांच्या भाषेवर संत नामदेवाचे संस्कार आढळतात. पण नंतरच्या काळात अंत तुकारामानी आख्यान रचलेले आहे. यावरुन असे स्पष्ट होते की मध्ययुगीन काळातील भारतीय संतकवींचे भाषाभान आगदी प्रगल्भ होते असे म्हावे लागेल. गुजरात प्रांतामधील "प्राणनाथ" या संतांनी गुजरातीसह, संस्कृत, सिंधी, हिंदी, आरबी, फारसी, शिवाय वेगवेगळ्या भाषा अवगत होत्या. केरळमधील संत कवी पूंतानम्र यांनी कालीकत दरबारत मल्याळम बोली भाषेत काव्यगायन केले. तेलगु संत कवीने आपल्या तेलगु संत काव्यात मराठी ओळीची जाणीव पुर्वक निर्मितीकेली.तर शहा मुंतोजी ब्रहमणी, हुसेन अंबरखान, आलमखान, शेख महंमद, शहा मुनी अशा अनेक मुस्लीम संतांनी मराठी भाषेतुन रचना केली. तसेच विरशैव संतानी तेलगु, मराठी, व कन्नड भाषेत आपले विचार मांडले. 'गुरू ग्रंथसाहेब' मध्ये नामदेव, शेख फरिद य संताचे अभंग आहेत, अशी कित्येक उदाहरणे मध्ययुगीन भारतीय भिषिक देवाण- घेवाणीची आगदी पारदर्शक प्रक्रिया दाखवणारी आहेत. स्वत:च्या भाषे समवेत इतरांच्या भाषेलाही मान सन्मान देणे, तसेच भाषेच्या देवाण घेवाणीच्या माध्यमातून देशाची राष्ट्रीय ऐक्य आणि प्रगतीशील विचार साधण्याचा प्रयत्न करणे. या बाबी म्हणजेच मध्ययुगीन संताचा विद्रोहच होय. ७

लोकभाषेच्या स्विकारासाठी मध्ययुगीन भारतीय संतानी प्रचारासह अन्य प्रांतातील लोकभाषेचा अंगीकार करण्याचा प्रयत्नय केला. देव, धर्म, जात, वेद, या सर्वांना नकार देत नवीन व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला.या शिवाय सर्व देशभरात स्त्री पुरूष समानता रुजवण्याचा प्रयत्न केला. मध्ययुगीन काळातील संताचे कार्य

म्हणजे त्यांनी केलेला विद्रोहच होय. संत महतांच्या विद्रोहाचे भारतीयांच्या समाजमनावर जातीपंथ निरपेक्ष असा बंधूभाव परस्परात निर्माण करण्याचा मोलाचा मंत्र दिल्याचे जाणवते. संतांच्या विद्रोही भूमीकेने सामुदायीक सदाचाराची आणि नितिमत्तेची शिकवण दिली. संत काळातील धर्मातीत आहेत. संत साहित्य समकालीन, वर्तमानाला, जातीधर्मनिरपेक्ष अशा बंधुभावाचा तसेच सामुदायीक सदाचाराचा तरोच नितीमत्तेचा संस्कार देत आहे. आणि वरील संस्कारांचा हे ठेवा कधी ही न संपणारा आहे.८

संदर्भ :-


१) डहाके व संत अबाजी 'कविते विषयी' स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद १९९९.

२) सवनीस श्रीपाल संत साहित्यातील सेक्युलॅरिझन दारताने रामचंद्र आणि कंपनी पुणे २००२.

३) ढेरे, रा. चि. 'एकात्मतेचे शिल्पकार' मंजूल प्रकाशन, पुणे १९९४

४) कज्हाडे सदा 'काव्यचिंतन' शलाका प्रकाशन, मुंबई १९९७

५) मेणसे कृषा श्री बसवेश्वर ते श्री. ज्ञानेश्वर: एक चिंतन दुसरी आवृत्ती १९९९

६) भावाळकर तारा स्त्री मुक्तीचा आत्मस्वर लोकवाङ्मयगृह मुंबई दुसरी आवृत्ती २०१२

७)जगतगुरू श्री संत तुकाराम महाराज स्मारक ग्रंथ, जिजाऊ ग्रंथालय पुणे.

८) शिक्षण स्वामी विवेकानंद रामकृष्ण मठ नागपुर.

९) शेणोलीकर ह.श्री., प्राचीन वाङ्मयाचे स्वरुप.